# प्रेसनोट दि. १३/०३/२०१९

## धायरी रोड, न-हे, पुणे येथील "ओम स्पा ॲण्ड सलुन" मसाज सेंटरवर छापा
## २ परराज्यातील मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## स्पा मसाज सेंटर चालक महिला अटकेत

दि.१२/०३/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना सपोनि. अनिता खेडकर यांचे कडुन माहिति मिळाली की, "ओम स्पा ॲण्ड सलुन" फ्लॅट नंबर २०६, वरद विनायक कॉम्प्लेक्स, पहिला मजला, पारे चौक, धायरी रोड, न-हेगां,व ता. हवेली, जि. पुणे येथे महिला नामे सारीका रणजित साबळे व राहुल जाधव हे त्यांचे मसाज पार्लर सेंटर मध्ये ठेवलेल्या परराज्यातील थेरपीस्ट महिलांचेकडुन मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे व विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच सिंहगड रोड पोलीस स्टेशनकडील सपोनि पाटील व त्यांचे सोबतचे स्टाफ यांनी संयुक्त कारवाई करून न-हे परिसरातील "ओम स्पा ॲण्ड सलुन" फ्लॅट नंबर २०६ वरद विनायक कॉम्प्लेक्स, पहिला मजला, पारे चौक, धायरी रोड, न-हेगाव ता. हवेली, जि. पुणे येथे चालत असलेल्या स्पा मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान ०१ मेघालय व ०१ मणिपुर राज्यातील अशा एकुण २ सज्ञान महिलांची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारी महिला नामे सारीका रणजित साबळे, वय २७, रा. १९१ शिंदे आळी, शुक्रवार पेठ, पुणे व राहुल दत्तात्रय जाधव, रा. पिंपरी पुर्ण पत्ता माहित नाही. यांचे विरुध्द सिंहगड रोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २१८/२०१९ इटपा ॲक्ट कलम ३,४,५,७. सह भादंवि कलम ३७०, ३७० अ, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सारीका रणजित साबळे हिस कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ४५००/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, पोउपनि. योगिता कुदळे, सपोफौ शेलार, पोहवा. राजाराम घोगरे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, पोना. तुषार आल्हाट, सुनिल नाईक, रेवणसिध्द नरोटे, मपोहवा. ननिता येळे, मपोना. रुपाली चांदगुडे यांनी व सिंहगड रोड पोलीस स्टेशनकडील सपोनि पाटील व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.